पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा. क्रीडा समिती

कार्यपत्रिका क्रमांक - १०

**सभावृत्तांत**

दिनांक - २१/०१/२०१५ वेळ - दुपारी २.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रीडा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक २१/०१/२०१५ रोजी दुपारी २.०० वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१) मा. ननवरे जितेंद्र बाबा - सभापती**
**२)** मा. तानाजी विठ्ठल खाडे
**३)** मा. लोंढे शुभांगी संतोष
४) मा. सुपे आशा रविंद्र

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.बेंडे - प्रशासन अधिकारी, मा.रज्जाक पानसरे - क्रीडा अधिकारी, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक : मा.तानाजी खाडे अनुमोदक : मा.आशा सुपे

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे माजी मुख्य आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ.नागकुमार कुणचगी यांचे दु:खद निधन झाले असल्याने त्यांना श्रध्दांजली वाहून बुधवार दि.०४/०२/२०१५ रोजी दुपारी १.४५ पर्यंत सभा तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

( सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली )

**सभापती -** बुधवार दिनांक ०४/०२/२०१५ रोजी दुपारी १.४५ पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**( ननवरे जितेंद्र बाबा )**
**सभापती**
क्रीडा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा. क्रीडा समिती

कार्यपत्रिका क्रमांक - १०

**सभावृत्तांत**

( दिनांक २१/०१/२०१५ ची तहकूब सभा )

दिनांक - **०४/०२/२०१५** वेळ - दुपारी **१.४५** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रीडा समितीची दिनांक २१/०१/२०१५ ची तहकूब सभा बुधवार दिनांक **०४/०२/२०१५** रोजी दुपारी **१.४५** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) **मा. ननवरे जितेंद्र बाबा - सभापती**
२) मा. तानाजी विठ्ठल खाडे
३) मा. लोंढे शुभांगी संतोष
४) मा. मोटे किरण बाळासाहेब
५) मा. सौ.साळुंके सविता सुरेश
६) मा. गिता सुशिल मंचरकर

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.बेंडे - प्रशासन अधिकारी, मा.रज्जाक पानसरे - क्रीडा अधिकारी, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

दिनांक ०७/०१/२०१५ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्र. ९)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक - ६९ विषय क्रमांक - १

दिनांक - ०४/०२/२०१५ विभाग - क्रीडा

सुचक - मा.सविता साळुंके अनुमोदक - मा.गिता मंचरकर

संदर्भ - मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/६९१/२०१४, दि.०८/१२/२०१४

विषय - क्रीडा विभागाकडील ई निविदा नोटीस क्र.१/३/२०१३-१४ भोसरी निवास जलतरण तलाव पाणी शुध्दिकरण, परिसर स्वच्छता, साफसफाई देखभाल व यांत्रिक देखभाल दुरुस्ती कामकाजाबाबत ....

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ७० विषय क्रमांक - २
दिनांक - ०४/०२/२०१५ विभाग - क्रीडा
सुचक - मा.शुभांगी लोंढे अनुमोदक - मा.सविता साळुंके
संदर्भ - मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/७१४/२०१४, दि.२९/१२/२०१४
विषय - क्रीडा विभागाकडील ई निविदा नोटीस क्र.१/२/२०१३-१४ थेरगाव जलतरण तलाव पाणी शुध्दिकरण, परिसर स्वच्छता, साफसफाई देखभाल व यांत्रिक देखभाल दुरुस्ती कामकाजाबाबत .....

विषय क्रमांक २ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ७१ विषय क्रमांक - ३
दिनांक - ०४/०२/२०१५ विभाग - क्रीडा
सुचक - मा.गिता मंचरकर अनुमोदक - मा.सविता साळुंके
संदर्भ - मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/७१९/२०१४, दि.२९/१२/२०१४
विषय - क्रीडा विभागाकडील ई निविदा नोटीस क्र.१/९/२०१३-१४ मोहननगर जलतरण तलाव पाणी शुध्दिकरण, परिसर स्वच्छता, साफसफाई देखभाल व यांत्रिक देखभाल दुरुस्ती कामकाजाबाबत ...

विषय क्रमांक ३ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ७२ विषय क्रमांक - ४
दिनांक - ०४/०२/२०१५ विभाग - क्रीडा
सुचक - मा.सविता साळुंके अनुमोदक - मा.तानाजी खाडे
संदर्भ - मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/७१७/२०१४, दि.२९/१२/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन -

क्रीडा विभागाकडील ई निविदा नोटीस क्र.१/७/२०१३-१४ यमुनानगर जलतरण तलाव पाणी शुध्दिकरण, परिसर स्वच्छता, साफसफाई देखभाल व यांत्रिक देखभाल दुरुस्ती कामकाजासाठी प्राप्त झालेल्या लघुतम दरानुसार **मे.वरदायिनी एन्टरप्राईजेस, चिंचवड** यांना यमुनानगर जलतरण तलाव पाणी शुध्दिकरण, परिसर स्वच्छता, साफसफाई देखभाल व यांत्रिक देखभाल दुरुस्ती कामकाज देणेकामी पहिल्या वर्षात दरमहा र.रु.९७,०२०/- प्रमाणे १२ महिन्यांकरिता र.रु.११,६४,२४०/- ( अक्षरी र.रु.अकरा लाख चौसष्ट हजार दोनशे चाळीस फक्त )

चे खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( ननवरे जितेंद्र बाबा )**
**सभापती**
क्रीडा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/ ८७ /२०१५
दिनांक : ०४/०२/२०१५



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या
कार्यवाहीसाठी रवाना.

\\172.16.0.152\e\e drive\Nagersachiv1\Krida-14-15\proceeding1_Krida 10.doc